सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य
शिवछत्रपती क्रीडा संकुल,महाळुंगे-बालेवाडी, पुणे-४११ ०४५.
संकेतस्थळ : https://sports.maharashtra.gov.in ई-मेल: dsysdesk11@gmail.com

क्र.क्रीयसे क्रीप्रप्रवेश-२०२४/का-११ /७३६ दि. 25 JUN 2024

प्रति,
विभागीय उपसंचालक - सर्व
जिल्हा क्रीडा अधिकारी - सर्व
प्राचार्य, क्रीडा प्रबोधिनी -सर्व

**विषय - शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी मध्ये सन २०२४-२५ करीता सरळ व कौशल्य चाचणी व्दारे निवासी व अनिवासी खेळाडूं करीता नविन प्रवेश देणे बाबत.**

महाराष्ट्रातून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करुन त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण,संतुलीत आहार व अद्यावत क्रीडा सुविधा पूरवून त्यासाठी सुसंघटीत प्रयत्न करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, शिवछत्रपती क्रीडापीठ म्हाळुंगे-बालेवाडी पुणे अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. सन २०२४-२५ साठी शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत सदर ०९ क्रीडा प्रबोधिनीत सरळप्रवेश (५०%) व कौशल्य चाचणी (५०% )प्रक्रियेअंतर्गत खालील निकषानुसार निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार आहेत. सदर प्रवेश प्रक्रीया साठी खालील प्रमाणे नियम अटी व शर्ती राहणार आहेत.

१. **क्रीडा प्रबोधिनी ठिकाणे -**

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, गडचिरोली अशा ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली होती. सदर ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी मध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रीया राबवण्यात येणार आहे.

२. **क्रीडा प्रबोधिनी मधिल क्रीडा प्रकार -**

ज्युदो, जिम्नॅस्टीक्स, हॉकी, शुटींग, फुटबॉल, जलतरण, ॲथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅन्डबॉल, टेबल टेनिस, वेटलिफिटंग, ट्रायथलॉन, सायकलिंग, बॉक्सींग अशा १७ क्रीडा प्रकारात प्रशिक्षण देण्यात येते.

**३. प्रवेश प्रक्रीया सरळ प्रवेश व कौशल्य चाचणी -**

- **सरळ प्रवेश प्रक्रिया** :- क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू ज्यांचे वय १९ वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची चाचणी तज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चित केला जातो.
- **खेळनिहाय कौशल्य चाचणी** :-क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्यासंबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंना ज्यांचे वय १९ वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करुन गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जातो

Scanned with OKEN Scanner

- **वैद्यकीय चाचणी** - उपरोक्त चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाव्दारे चाचणी घेवून क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारीरिक दृष्टया सुदृढ खेळाडूंची निवड अंतिम करण्यात येत

**४. जिल्हा ,विभाग व राज्यस्तरावर चाचण्या आयोजित करताना करावयाची कार्यवाही -**

**अ.जिल्हास्तर -**

१. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांच्या वतीने विभाग व राज्य क्रीडा प्रबोधिनी चाचण्यां बाबत माहिती शैक्षणिक संस्था /शाळा/क्रीडा संस्था मंडळे/एकविध खेळ संघटना यांना परिपत्रक/पत्र काढून अवगत करण्यात यावा .

२. जिल्हायास्तरावर क्रीडा प्रबोधिनी विभाग चाचणीसाठी सहभागी होणा-या खेळाडूंची नावे नोदणी करण्यात यावी. खेळाडूंचे नाव, जिल्हा, खेळप्रकार, जन्मदिनांक, वय व क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र याबाबत माहिती संकलित करून विभागीय चाचणीसाठी पाठविण्यात यावे. खेळाडुचे जन्म दिनांक बाबत योग्य कागदपत्र तपासावीत .

३. जिल्हास्तरावर नोदणी झालेल्या खेळाडूंची प्रवेशिका परिशिष्ट अ नुसार विभागस्तर चाचणीकरिता चाचणी दिनांकाच्या दोन दिवस पूर्वी पाठविण्यात यावी.

४. क्रीडा प्रबोधिनी चाचणीबाबत विस्तृत प्रसिध्दी स्थानिंक वर्तमानपत्रे, मिडिया व इतर आवश्यक ठिकाणी करण्यात यावी.

**ब.विभागस्तर -**

१. विभागस्तरावर कौशल्य व सरळ प्रवेश चाचण्यांचे आयोजन करण्यात यावे.

२. विभागाअंतर्गत जिल्हयातून प्रवेशिका नुसार खेळाडूंची खेळ निहाय चाचण्या घेण्यात याव्यात.

३. विभागीय उपसंचालक यांनी खेळनिहाय विभागस्तर क्रीडा कौशल्य चाचणीचे आयोजन दिनांक ८ ते ९ जुलै २०२४ दरम्यान आयोजित करावयात.

| अ.क्र. | चाचणीप्रकार | खेळ |
|---|---|---|
| १ | सरळ प्रवेश | आर्चरी, हॅण्डबॉल, बॉक्सिंग, कुस्ती, बॅडमिंटन - अनिवासी, ॲथलेटिक्स, जलतरण, शूटिंग, सायकलींग, हॉकी, फुटबॉल, ज्युदो , टेबल टेनिस, वेटलिफटींग जिम्नॅस्टिक्स |
| २ | कौशल्य चाचणी | हॅण्डबॉल,जलतरण, सायकलींग, फुटबॉल, ज्युदो , जिम्नॅस्टिक्स, |

**४. विभागस्तर क्रीडा कौशल्य व सरळ प्रवेशाकरीता खालील प्रमाणे निवड समिती विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संबंधित विभाग यांनी गठीत करावी.**

| अ.क्र. | समितीसदस्य | पद |
|---|---|---|
| १ | विभागीय उपसंचालक ,संबंधित | अध्यक्ष |
| २ | जिल्हा क्रीडा अधिकारी /संबंधित प्रबोधिनी प्राचार्य/ तालुका क्रीडा अधिकारी - १ | सदस्य |
| ३ | संबंधित खेळाचे विभागात कार्यरत असलेले राज्य क्रीडा मार्गदर्शक किंवा खाजगी प्रशिक्षण देणारे राज्य/राष्ट्रीय स्तरावरचे क्रीडा मार्गदर्शक /संबंधित खेळाचे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी -१ | सदस्य |

५. विभागस्तरावरुन निवड करण्यात आलेल्या खेळाडुंचा प्रवेश अर्ज राज्यस्तर चाचणीसाठी पाठविण्यात यावा. व संबधित खेळाडूंना खेळ निहाय वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याचे कळविण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

**४. क्रीडा प्रबोधिनी अंतर्गत नव्याने प्रवेश घेण्याच्या खेळाडूंना आगामी प्रशिक्षण धोरणाबाबत माहिती देण्यात यावी –**

मिशन लक्षवेध अंर्तगत खालील तीन स्तरीय प्रशिक्षण यंत्रणा स्थापन करण्यात येणार आहेत.

- **राज्यस्तरावर – हाय पररफॉरमन्ससेंटर**
- **विभागीय स्तरावर – विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर**
- **जिल्हास्तर- क्रीडा प्रतिमा विकास केंद्र**

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडलेल्या १२ क्रीडा प्रकारांची तीन स्तरावरील प्रशिक्षण यंत्रणा स्थापन केली जाणार आहे. प्रत्येक क्रीडा प्रकाराता तज्ज्ञ व्यतींच्या माध्यमातून राज्यातील खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीनुसार विविक्षित क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंची निवड केली जाणार आहे. सर्वसाधारणत: राज्यस्तरावरील सहभागी/पदक विजेत्या खेळाडूंची निवड जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी करण्यात येईल. तर राष्ट्रीय विजेत्या खेळाडूंची निवड विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर करिता करण्यात येईल. राष्ट्रीयस्तरावरील. पदक विजेते व भारतीय संघा करिता निवडलेल्या संभाव्य खेळाडूंमध्ये समावेश असलेल्या राज्यातील खेळाडूंची निवड हाय पररफॉरमन्स सेंटरकरिता केली जाईल. या निवड झालेल्या सर्व खेळाडूंना त्यांच्या कामगिरीनुसार त्रिस्तरीय प्रशिक्षण यंत्रणेच्या ठिकाणी अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात येईल.

उपरोक्त बाबींचा विचार करता क्रीडा प्रबोधिनी मधिल खेळाडूंना वरील प्रमाणे आगामी काळात मिशन लक्षवेध अंतर्गत त्रिस्तरीय प्रशिक्षण सरचनेमध्ये प्रवेश घेण्यासाठी संधी उपलब्ध राहणार आहे. यामुळे क्रीडा प्रबोधिनी मधिल प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थीना वरील १२ क्रीडा प्रकारातील मिशन लक्षवेध अंतर्गत प्रवेश देताना निर्धारीत केलेली प्रवेशाची मानके पूर्ण करणे आवश्यक राहणार आहेत. याबाबी विचारात घेता खालील प्रमाणे क्रीडा प्रबोधिनी मध्ये नव्याने प्रवेश घेण्या-या प्रशिक्षणार्थीना या धोरण बाबत माहिती देण्यात यावी .

- मिशन लक्षवेध अंतर्गत हाय पररफॉरमन्ससेंटर १२ क्रीडा प्रकारात स्थापित करताना सदर सेंटर मध्ये क्रीडा प्रबोधिनी प्रशिक्षणार्थी प्रवेशाची अर्हता पूर्ण करतील त्यांना प्राधान्य राहील. ( राष्ट्रीयस्तरावरील पदक विजेते व भारतीय संघा करितानिवडलेल्या संभाव्य खेळाडूंमध्ये समावेश असलेल्या राज्यातील खेळाडू)
- क्रीडा प्रबोधिनी मधिल जे प्रशिक्षणार्थी विभागस्तरावर गठीत होणा-या विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर मधिल प्रवेशाची अर्हता पूर्ण करीत त्यांना विभागीय सेंटरमध्ये प्रवेश देण्यात येईल. ज्या ठिकाणी विभागीय सेंटर सुरु होईलसदर ठिकाणी प्रबोधिनी प्रशिक्षणार्थीचा प्रवेश वर्ग करण्यात येईल. राष्ट्रीय स्तरावरील सहभागी पदक/विजेत्या खेळाडूंची निवड विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर करिता करण्यात येईल.
- जे प्रशिक्षणार्थी जिल्हास्तरावरील क्रीडा प्रतिभा केंद्रा मध्ये प्रबेशासाठी राज्यस्तरावरील सहभागी पदक/ विजेत्या खेळाडूंची निवड जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी करण्यात येईल. सदरचे केंद्रामध्य अनिवासी क्रीडा प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने खेळाडूंना सदर प्रकाराचे प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छुक असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनी प्रवेशित प्रशिक्षणार्थी उपरोक्त प्रकाराचे प्रशिक्षण घेण्यासाठी त्याचा प्रवेश प्राधान्याने वर्ग करण्यात येईल . सदर खेळाडू या प्रकारचे प्रशिक्षण घेण्यास असहमती दर्शवली तर त्यांचा प्रवेश रद्द करणे क्रमप्राप्त राहणार आहे.

**५. क्रीडा प्रबोधिनी मध्ये खेळाडूंच्या रिक्त पद संख्या –**

राज्यातील ९ क्रीडा प्रबोधिनी मध्ये खेळ निहायरिक्त पदांची संख्या सोबत **परिशिष्ट- अ** नुसार आहेत. त्यानुसार रिक्त संख्या तसेच खेळाडूंची क्षमता,कौशल्य विचारात घेवून प्रवेश देण्यात येईल. निवडण्यात येणा-या खेळाडूंना राज्यातील कोणत्याहि क्रीडा प्रबोधिनी मध्ये प्रशिक्षण स्थळ हे क्रीडा संचालनालय स्तरावर निश्चित करण्यात येईल. त्यानुसार प्रवेश संबंधित क्रीडा प्रबोधिनी मध्ये घेणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

क. राज्यस्तर चाचणी

१. राज्यस्तर चाचणी सरळ प्रवेश खालील वेळापत्रका प्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | खेळ प्रकार | चाचणी दिनांक | खेळाडू उपस्थिती | चाचणी स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | आर्चरी | १५ ते १६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | क्रीडा प्रबोधिनी, अमरावती |
| २ | हॅण्डबॉल | १५ ते १६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | क्रीडा प्रबोधिनी, नागपूर |
| ३ | बॉक्सिंग | १५ ते १६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | क्रीडा प्रबोधिनी, अकोला |
| ४ | कुस्ती | १५ ते १६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | क्रीडा प्रबोधिनी, कोल्हापूर |
| ५ | बॅडमिंटन - अनिवासी | १५ ते १६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | क्रीडा प्रबोधिनी, ठाणे व नागपूर |
| ६ | ॲथलेटिक्स, जलतरण, शूटिंग, सायकलींग, हॉकी, फुटबॉल, , टेबल-टेनिस, वेटलिफ्टींग, जिम्नॅस्टिक्स, | १५ ते १६ जुलै २०२४ | १५ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | शिवछत्रपती क्रीडासंकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे ४५ |

२. राज्यस्तर खेळनिहाय कौशल्या चाचणी खालील वेळापत्रकानुसार राबविण्यात येईल.

| अ. क्र | खेळप्रकार | चाचणी दिनांक | खेळाडू उपस्थिती | चाचणी स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | हॅण्डबॉल | १७ ते १८ जुलै २०२४ | १७ जुलै २०२४ रोजी सकाळी १०:०० वा पर्यंत चाचणी स्थळी | क्रीडा प्रबोधिनी, नागपूर |
| २ | जलतरण, ज्युदो , सायकलींग, फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स, | १७ ते १८ जुलै २०२४ | १७ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वा पर्यंत चाचणी स्थळी | शिवछत्रपती क्रीडासंकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे ४५ |

उपरोक्त नमूद कार्यक्रमात ९ क्रीडा प्रकाराकरिता फक्त सरळ प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच उर्वरित जलतरण, सायकलींग, फुटबॉल, ज्युदो , जिम्नॅस्टिक्स, हॅण्डबॉल या खेळांकरिता सरळ प्रवेश तथा खेळनिहाय कौशल्य चाचणी द्वारा प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

सायकलिंग, शुटींग व ॲथलेटिक्स या खेळाचे राज्य निपुनता केंद्र खेलो इंडिया अंतर्गत शिवछत्रपती क्रीडापीठ पुणे येथे मंजूर असल्याने सदर अंतर्गत प्रवेश उपरोक्त नुसार होणार आहेत.

Scanned with OKEN Scanner

६. **सर्वसाधारण सुचना –**

१. सदर चाचण्यांकरिता येणा-या खेळाडूंनी स्वत: निवास व भोजन व्यवस्था वैयक्तिक स्तरावर करावयाची आहे.

२. सदर चाचण्यांकरिता येणा-या खेळाडूंनी संबंधित स्पर्धेचे प्राविण्य /सहभाग प्रमाणपत्र , वयाचा पुरावा इ माहिती चाचणीस्थळी आणणे बंधनकारक आहे.

३. सरळ प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचण्यांच्या कार्यक्रमाबाबत राज्यातील सर्व जिल्हयात जाहीर व्यापक स्वरुपाची प्रसिध्दी सर्व विभागीय उपसंचालक व सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.

४. सदर मान्यतेत निवड प्रक्रिया राबविताना सरळ प्रवेश प्रक्रियेन्वये जर इच्छुकांची संख्या ५०% पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकरणी प्रथम त्यांना प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा व उर्वरित जागेंवर कौशल्य चाचणीव्दारे प्रवेश देण्यात यावा.

५. क्रीडा प्रबोधिनी चाचणी आयोजित करताना चाचणीसाठी येणा-या खेळाडूंना पिण्याचे पाणी व्यवस्था, चेजिंग रुम, इ. सुविधा आवश्यक साहित्य तसेच क्रीडांगण तसेच साहित्य पुरविण्यात यावेत. यासाठी स्थानिक स्तरावर पुरेशी तयारी करण्यात यावी. प्रथमोपचार पथक सदर निवड चाचणी ठिकाणी ठेवण्यात यावे.

५.विभागस्तर चाचण्यांचा सविस्तर अहवाल सरळ प्रवेश व खेळनिहाय प्रक्रिया यांची स्वतंत्र पात्र खेळाडूंची निवड यादी, निवड समितीचे सदस्य सचिव यांच्या मान्यतेने दिनांक ११ जुलै २०२४ पर्यंत शिवछत्रपती क्रीडापीठ कार्यालयास mahakridapeeth@gmail.com वर सादर करावा जेणेकरुन पुढील प्रक्रिया करणे सोयिस्कर होईल

६. विभागीय उपसंचालक अमरावती /नागपूर/कोल्हापूर/अकोला/मुंबई यांनी राज्यस्तर चाचणीचा सविस्तर अहवाल सरळ प्रवेश व खेळनिहाय प्रक्रिया यांची स्वतंत्र पात्र व अपात्र खेळाडूंची गुणानुक्रमे अंतिम निवड यादी, निवड समितीचे सदस्य सचिव यांच्या मान्यतेने दिनांक २२ जुलै २०२४ पर्यंत शिवछत्रपती क्रीडापीठ कार्यालयास mahakridapeeth@gmail.com वर सादर करावा.

७. सद्यस्थितीतील महाराष्ट्रात विविध जिल्हयात असलेल्या वातावरणाची स्थिती लक्षात घेता सदर सरळ प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचण्या राबविताना आपल्या जिल्हयात असणारे तापमान व भौगोलिक परिस्थितीचा अंदाज घेऊन चाचण्या घेण्यात याव्यात जेणेकरुन सदर प्रक्रियेत कोणतीही बाधा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(टिप्पणी मा. आयुक्त महोदयांनी मान्य केली आहे.)**

**(सुधिर मोरे)** 25/6/2024

**सहसंचालक**

**क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य,**

Scanned with OKEN Scanner

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनीमध्ये खेळनिहाय प्रवेश देण्यासाठी असलेली रिक्त पदांचा तपशिल

परिशिष्ट अ

| अ.क्र | प्रबोधिनी | खेळ | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| १ | पुणे | ॲथलेटिक्स | ११ |
| | | जलतरण | १६ |
| | | जुदो | १४ |
| | | जिम्नॅस्टिक्स | १० |
| | | हॉकी | ११ |
| | | शुटींग | १९ |
| | | फुटबाल | २४ |
| | | सायकलिंग | १५ |
| | | टेबलटेनिस | १ |
| | | वेटलिफ्टिंग | ८ |
| २ | कोल्हापूर | कुस्ती | २८ |
| | | शुटींग | २० |
| ३ | ठाणे | बॅडमिंटन | २० |
| ४ | नाशिक | ॲथलेटिक्स | २० |
| | | शुटींग | २४ |
| ५ | अकोला | बॉक्सिंग | -- |
| ६ | औरंगाबाद | ॲथलेटिक्स | १९ |
| | | हॉकी | ३० |
| ७ | अमरावती | आर्चरी | २० |
| ८ | नागपूर | ॲथलेटिक्स | २९ |
| | | हंड्बॉल | ३१ |
| | | बॅडमिंटन अनिवासी | २२ |
| | | | ३९२ |

Scanned with OKEN Scanner

क्रीडा प्रबोधिनी प्रवेश प्रक्रिया सन २०२४-२५ सर्व साधारण सूचना

- क्रीडा प्रबोधिनी प्रवेश प्रक्रिया सन २०२४-२५ स्तरनिहाय आयोजित करण्यात येणार आहेत
- जिल्हास्तरावर नाव नोंदणी ५ जुलै २०२४ पर्यंत / विभागस्तारवर चाचणी आयोजन ८-९ जुलै २०२४ पर्यंत / राज्यस्तर चाचणी आयोजन १५-१६ जुलै रोजी आयोजित होतील .
- मिशन लक्षवेध अंतर्गत असलेल्या खेलाकरिता मैदानी/ आर्चरी / बॉक्सिंग / वेटलिफ्टिंग / हॉकी/ कुस्ती/ शुटींग/ टेबल टेनिस / बेडमिंटन या खेळकरिता सरळ प्रवेश ( राज्यस्तर पदक किंवा राष्ट्रीय सहभाग ) असलेल्या खेळाडूंची चाचणी आयोजित होतील.
- हंड्बोल / जलतरण / सायकलिंग / फुटबॉल / जुदो / जीमनास्टिक्स या खेळांकरिता सरळ प्रवेश व कौशल्य चाचणी ( राज्यस्तर सहभाग असलेले खेळाडू ) अश्या दोन्ही प्रक्रियेद्वारे चाचण्या आयोजित कराव्यात.
- सरळ प्रवेश चाचणी अहवालात राज्यस्तरावर पात्र होणार्या खेळाडूंची यादी स्वतंत्र तसेच कौशल्य चाचणीत पात्र होणार्या खेळाडूंची यादी स्वतंत्र मा. विभागीय उपसंचालक यांच्या शिफारशीसह क्रीडापीठ मेलवर दिनांक ११ जुलै पर्यंत पाठवावी.
- मैदानी / सायकलिंग / शुटींग या खेलाकरिता राज्य निपुणता केंद्र २० वर्ष वयोगट अंतर्गत चाचणी आयोजित कराव्यात , उरलेल्या खेलाकरिता १९ वर्षाआतील मर्यादा असेल.
- प्रत्येक खेळाची चाचणी मानके लवकरच आपल्या मेल आयडीवर पाठवण्यातयेतील, त्यानुसार खेळनिहाय खेळाडूंची चाचणी आयोजित करून गुण देण्यात यावेत.
- विभागस्तर निवड समिती खेलनिहाय स्थापन करावी, सदर समितीची एक बैठक विभागस्तर आयोजनाआधी ओनलाईन घेण्यात येईल.
- राज्यस्तरावर खेळनिहाय दिलेल्या मानकानुसार खेळाडू पात्र होतील याची खबरदारी घेण्यात यावी, याकरिता जिल्हास्तरावर खेळाडूंची नाव नोंदणी करताना खेळाडूंनी सादर केलेल्या अधिकृत स्पर्धेतील प्रमाणपत्राची सरळ प्रवेश व कौशल्य चाचणी करिता असलेल्या मानकांची योग्य पडताळणी करून नोंदणी करावी काही अडचण असल्यास संबंधित खेळाच्या प्रबोधिनीत असलेल्या क्रीडा मार्गदर्शकाना संपर्क साधावा व तदनंतरच संबंधित खेळाडूस विभागस्तरावर चाचणी करिता मूळ प्रमाणपत्रसहित पाठविण्यात यावेत.
- विभागस्तारवर देखील संबंधित प्रमाणपत्राची पडताळणी करून तद्नंतर चाचणीचे आयोजन करावे.
- राज्यस्तरावर पात्र झालेल्या खेळाडूना खेळनिहाय संबंधित चाचणी स्थळी स्पर्धेचे मूळ प्रमाणपत्र , आधार कार्ड , चाचणी करिता लागणाऱ्या खेळनिहाय स्पोर्टकीट सोबत दिलेल्या वेळत व तारखेस हजर राहण्यास अवगत करावे.
- जिल्हास्तरावर प्रमाणपत्र पडताळणी तसेच खेळनिहाय वयोमर्यादा प्रमाणे विभागस्तरावर पात्र झालेल्या खेळाडूंची खेळनिहाय माहिती गुगलशिटवर भरण्यात यावी. लवकरच लिंक पाठवण्यात येईल.
- एखाद्या खेळात राज्यभरात विभागनिहाय चाचणी करिता खेळाडूंची संख्या कमी आल्यास सदर खेळाची चाचणी विभागस्तरावर आयोजित न करता सरळ राज्यस्तरावर होईल, म्हणून आपण ५ जुलै पर्यंत संबंधित खेळाची माहिती गुगल शिटवर न चुकता भरावी.. याबाबत दिरंगाई होता कामा नये.

Scanned with OKEN Scanner

**स्तरनिहाय क्रीडा कौशल्य व सरळ प्रवेश चाचणी आयोजनाचा कार्यक्रम**

| अ.क्र. | चाचण्यांचा स्तर | चाचण्या प्रकार | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तर | नाव नोंदणी अंतिग तारीख | ५ जुलै २०२४ पर्यंत |
| २ | विभागस्तर | सरळ प्रवेश | ८ जुलै २०२४ |
| | | कौशल्य चाचणी | ९ जुलै २०२४ |
| ३ | राज्यस्तर | सरळ प्रवेश | १५ जुलै २०२४ |
| | | कौशल्य चाचणी | १६ जुलै २०२४ |

**विभागस्तर - विभागीय उपसंचालक यांनी जिल्हास्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रवेशिका नुसार खेळनिहाय विभागस्तर क्रीडा कौशल्य चाचणीचे आयोजन दिनांक ८ ते ९ जुलै २०२४ दरम्यान आयोजित कराव्यात.**

| अ.क्र. | चाचणीप्रकार | खेळ |
|---|---|---|
| १ | **सरळ प्रवेश** | आर्चरी, हॅण्डबॉल, बॉक्सिंग, कुस्ती, बॅडमिंटन , अनिवासी, ॲथलेटिक्स, जलतरण, शूटिंग, सायकलींग, हॉकी, फुटबॉल, ज्युदो , टेबल टेनिस, वेटलिफटींग जिम्नॅस्टिक्स |
| २ | **कौशल्य चाचणी** | हॅण्डबॉल,जलतरण, सायकलींग, फुटबॉल, ज्युदो , जिम्नॅस्टिक्स, |

Scanned with OKEN Scanner